# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता. ०४/०१/२०१९ पोलीस स्टेशन - वाकड

## सराईत गुन्हेगारास अटक करुन एक महिन्यापुर्वी दाखल असणारी घरफोडी उघड करुन १४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त

वाकड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये राहणारे इसम नामे नितीन नंदलाल गोगीया,वय ४३ वर्ष, धंदा व्यवसाय,रा.फ्लॅट नं. ०१, तळमजला, कमलाकर निवास, समर्थ कॉलनी, विजयनगर, काळेवाडी, पुणे यांचे दि.०१/१२/२०१९ रोजी सांय ०६/३० वा. ते रात्रौ १०/३५ वा.चे सुमारास राहते घर कुलुप लावुन बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने बंद घराचे कुलुप कोयंडा तोडुन त्यावाटे घरात प्रवेश करुन घरात असलेले एकुण ४,७०,०००/- रुपयांचा मुद्देमाल त्यामध्ये एकुण १४० ग्रॅम सोन्याचे दागीने व रोख ५०,०००/- रुपये असा माल चोरुन नेलेबाबत त्यांनी दिलेले तक्रारीवरुन अज्ञात इसमाविरुध्द वाकड पो.स्टे. गु. र. नं. **१११९/२०१९** भादंवि कलम ४५४,४५७,३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना तपास पथकातील अधिकारी श्री. हरिष माने, सहा. पोलीस निरीक्षक यांनी माहीती घेतली असता फिर्यादी यांनी ०३ महीन्यापुर्वी एका इसमास त्यांचे दुकानासमोर चहा नाष्टयाची हातगाडी टाकण्यास मदत केली होती. त्या इसमाबाबत माहीती घेता त्याचेवर यापुर्वी जिल्हा जळगांव येथे गुन्हे दाखल असल्याची माहीती मिळाली. त्या अनुषंगाने तांत्रिक माहीतीच्या आधाराने शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता त्याने त्याचे नांव अनिल ऊंदराज कुकरेजा वय ४३ वर्ष रा. पिंपरी वाघीरे, पिंपरी, पुणे. असे सांगुन गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यास गुन्हयात दि. ३०/१२/२०१९ रोजी अटक करुन कौशल्यपुर्वक तपास करुन त्याचेकडुन गुन्हयात चोरुन नेलेले **एकुण १४० ग्रॅम सोन्याचे दागीने असा एकुण ४,२०,०००/- रुपयांचा मुद्देमाल** जळगाव येथुन हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर आरोपीचे मोडसबाबत तपास करता सदरचा आरोपी हा व्यापाऱ्यांशी ओळख वाढवुन त्यांचेशी संपर्क करुन त्यांची सहानुभुती मिळवुन त्यांचे दुकानामध्ये कामास राहत असे व त्यांचे घराची, घरातील लोकांची माहीती घेवुन चोऱ्या करीत असे. त्याचे रेकॉर्ड पाहता त्याचेविरुध्द खालील गुन्हे दाखल असल्याची माहीती मिळुन आली.

| अ. नं. | पोलीस स्टेशन | गु. र. नं. व कलम |
|---|---|---|
| १ | एमआयडीसी, जळगांव | १३/२०१३ भादंवि कलम ३९२ |
| २ | एमआयडीसी, जळगांव | १६३/२०१२ भादंवि कलम ३९२ |
| ३ | एमआयडीसी, जळगांव | २६६/२०१३ भादंवि कलम ३९२, |
| ४ | एमआयडीसी, जळगांव | २५६/२०१६ भादंवि कलम ३९४, ५०४,५०६, ३४ |
| ५ | एमआयडीसी, जळगांव | २३६/२०१७ भादंवि कलम ३७९ |
| ६ | शनिपेठ, जळगांव | १२/२०१५ भादंवि कलम ३७९, |
| ७ | शहर पोलीस स्टेशन जळगांव | ३९/२०१७ भादंवि कलम ३७९, |
| ८ | जिल्हापेठ जळगांव | ५८/२०१५ भादंवि कलम ३७९ |

सदरची कारवाई मा. श्री. संदीप बिष्णोई सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. रामनाथ पोकळे सो, अपर पोलीस आयुक्त. पिंपरी चिंचवड, मा. श्री. विनायक ढाकणे सो, पोलीस उप आयुक्त,

परि-२, पिंपरी चिंचवड, श्री. श्रीकांत मोहीते, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सतिश माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री. राजकुमार राजमाने, पोलीस निरिक्षक (गुन्हे), श्री. विरेंद्र चव्हाण सहा. पोलीस निरीक्षक, श्री. हरिष माने सहा. पोलीस निरीक्षक, श्री. सिदधनाथ बाबर पोलीस उप निरीक्षक व तपास पथकातील पोलीस कर्मचारी - बिभीषन कन्हेरकर, बापुसाहेब धुमाळ, प्रमोद भांडवलकर, जावेद पठाण, नितीन ढोरजे, रमेश गायकवाड, विक्रम जगदाळे, दिपक भोसले, प्रमोद कदम, विक्रम कुदळ, नितीन गेंगजे, शाम बाबा, सुरेश भोसले, सचिन नरुटे, सुरज सुतार, तात्या शिंदे, प्रशांत गिलबिले यांनी केली.

